# मराठींतील अलीकडील अर्थशास्त्रीय पाठ्य पुस्तकें

आनंद नाडकर्णी, माधव कानेटकर

अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचा परिचय मराठींतून करून देण्याची आवश्यकता पुरी करण्यासाठीं आज ग्रंथलेखन होत आहे, ही गोष्ट स्वागतार्ह आहे. या विषयावरील दहाबारा पाठ्य पुस्तकें [1] आतां प्रसिद्ध झालीं असल्याकारणानें साधारणत: अर्थशास्त्रीय पाठ्य पुस्तकांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा, मराठी लेखकांच्या या बाबतींतील विशेष जबाबदाऱ्या, इत्यादि मुद्यांच्या अनुषंगानें मराठींतील पाठ्यपुस्तकलेखनाचें मूल्यमापन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे असें आम्हांस वाटतें. इंग्रजी अमदानीच्या प्रारंभीच्या कालांत व नंतरहि अर्थशास्त्र हा विषय मराठींतून मांडण्याचे प्रयत्न गो. चि. भाटे, वा. गो. काळे व द. गो. कर्वे, न. वि. गाडगीळ इत्यादि लेखकांनीं केलें होतें हें खरें. परंतु हे प्रयत्न आजच्या पाठ्यपुस्तकलेखनाच्या स्वरूपाचे नव्हते, त्यांचा विचार वेगळाच करावा लागेल. पाठ्य पुस्तकांच्या प्रकारचें लेखन आतां वाढल्या प्रमाणावर होत राहील अशीं चिन्हें दिसत आहेत आणि पाठ्य पुस्तकांच्या लेखकांनीं एक नवीनच उपक्रम सुरू केला आहे असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. प्रस्तुत लेखांत केवळ अशा पाठ्य पुस्तकांचाच विचार करावयाचें आम्हीं ठरविलें आहे.

या पाठ्य पुस्तकांविषयीं लिहितांना एका मूलगामी विचाराचा प्रथमच निर्देश करणें आवश्यक आहे. कित्येक वेळां असें सांगण्यांत येतें कीं अर्थशास्त्रामधील कांहीं प्रमेयें वस्तुस्थितीची तपशीलवार पाहाणी करून मांडण्यांत आलीं नसल्याकारणानें प्रत्यक्ष परिस्थितीचें स्वरूप विशद करून सांगण्यास तीं विशेष समर्थ नसतात.[2] अर्थात् अशा प्रमेयांवर आधारलेल्या अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा लोकांना परिचय करून देण्याची गरजच आहे किंवा काय असा मूलगामी प्रश्न कोणी उपस्थित करूं शकेल. या वादांत न शिरतां, अर्थशास्त्राच्या सर्व मूलतत्त्वांचा अभ्यास फलदायी आहे अशी श्रद्धा बाळगूनच विविध लेखकांनीं पाठ्य पुस्तकें लिहिलीं आहेत. हें उघड आहे. ही श्रद्धा गृहीत धरून अपेक्षित अशी कामगिरी बजावण्यांत त्यांना कितपत यश आलें आहे याचीच आम्ही येथें चर्चा करणार आहोंत. प्रस्तुत संदर्भांत स्थूल मानानें दोन प्रकारच्या अपेक्षा संभवतात : (१) अर्थशास्त्रीय तत्त्वांची कोणच्या अनुक्रमानें व संगतीनें फोड करून सांगावी या मुद्याबाबतच्या अपेक्षा, व (२) लेखकाच्या अभिव्यक्तीसंबंधीच्या अपेक्षा. अर्थशास्त्रावरील मराठींतील लेखन अजूनहि प्रथमावस्थेंत असल्यामुळें अभिव्यक्तीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अर्थवाही परिभाषेबाबतचा होय. परंतु परिभाषेचा वादग्रस्त प्रश्न एका

(१) पहा : व. गो. सहस्रबुद्धे : अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें; भा. ह. मुंजे : आधुनिक अर्थशास्त्र; मा. शं. भणगे : आधुनिक अर्थशास्त्र ( भाग पहिला ); रा. म. गोखले : अर्थशास्त्र-परिचय ( सुधारलेली दुसरी आवृत्ति ); चिं. त्र्यं. येवलेकर : अर्थशास्त्राची रूपरेषा; या. शि. महाजन, स. मा. गर्गे,-अ. रा. कुलकर्णी : अर्थशास्त्र-प्रवेश; म. शं. आजगांवकर : पदवीपूर्व अर्थशास्त्र; बा. कृ. पाटील : सुगम अर्थशास्त्र, इत्यादि. शिवाय व. गो. सहस्रबुद्धे : चलनशास्त्र व चलननीतिं, कल्याणकारी राज्याचें अर्थकारण.

(२) व. गो. सहस्रबुद्धे : अर्थशास्त्र-परिचय (दुसरी आवृत्ति), प्रा. ध. रा. गाडगीळ यांनीं लिहिलेली प्रस्तावना पाहावी.